''आकाशवाणी नांदेड केंद्राच्या कार्यक्रमांचा, समाजावर होणाऱ्या परिणामांचा व सामाजिक परिवर्तनाचा अमाजशास्त्रीय अभ्यास''

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
विष्णुपूरी, नांदेड महाराष्ट्र राज्य

समाजिक विज्ञान शाखेअंतर्गत समाजशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी
मिळविण्यासाठी सादर करावयाचा संक्षिप्त आराखडा

संशोधक

कु. घोटकेकर कांचन नारायणराव

एम.ए.समाजशास्त्र

मार्गदर्शक

प्राचार्य, डॉ. डी. डी. घोडगे

लोकमान्य महाविद्यालय, सोनखेड जि. नांदेड

संशोधक केंद्र

समाजशास्त्रे संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, महाराष्ट्र राज्य

ऑक्टो. २०१६

प्रस्तावना:

मानवी विचारांना गतिमान करण्यासाठी आणि शाश्वत सत्य लोकांमध्ये खोलवर रूजविण्यासाठी प्रसार माध्यमांचा मोठा वाटा असल्याचा आपल्याला दिसून येतो. आज केवळ प्रसारमाध्यमांच्या जोरावर जग जवळ आले आहे नव्हे तर विचारांची देवाणघेवाण मोठया प्रमाणात सुरू असल्याचे लक्षात येते.

प्रसार माध्यमांचे विविध प्रकार आहेत जसे की, दृक माध्यम, श्राव्य माध्यम आणि दृकश्राव्य माध्यम होय. वर्तमानपत्र हे प्रभावी दृक माध्यम म्हणून नावारूपाला आले आहे. तरीसुध्दा निरक्षर लोकांना या माध्यमाचा फायदा होत नसल्याने त्यांच्या यशस्वितेत थोडयाफार प्रमाणात मर्यादा येते. दृकश्राव्य माध्यमात दूरदर्शनचा समावेश होतो. तरीसुध्दा या माध्यमातून माहिती घेणे हे सर्वमासान्यांच्या खिशाला परवडणारे नाही. श्राव्य साधनामध्ये प्रामुख्याने आकाशवाणीचा उल्लेख करता येईल. रेडीओ हे माध्यम सर्वसामान्यांना परवडेल असे असून विनामूल्य आपण त्याचे प्रसारण ऐकू शकतो एवढेच नव्हे तर निरक्षर लोकांनाही याच श्राव्य माध्यमातून जास्तीत जास्त ज्ञान, मनोरंजन होते म्हणून एक प्रभावी श्राव्य साधन म्हणून आकाशवाणीकडे पाहिले जाते.

मनोरंजन आणि जनसंपर्काच्या प्रमुख माध्यमांपैकी नभोवाणी अर्थात आकाशवाणी हे श्राव्य माध्यम आहे. या माध्यमाची स्वत:ची अशी प्रसारण निती आहे. देशाच्या ग्रामीण भागातील वाडया—वस्त्यात राहणाऱ्या लोकांचे मनोरंजन, लोकशिक्षण व माहिती प्रसारण यासाठी आकाशवाणीची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. आकाशवाणीमुळे मानवी जीवनाला फार मोठी कलाटणी मिळाली आहे. ऑल इंडिया रेडीओ या भारत सरकारच्या नभोवाणीस आकाशवाणी म्हणून ओळखले जाते. इ.स. १८७६ मध्ये ग्रॅहम बेलने दूरध्वनीचा शोध लावला. या शोधामुळे तारेच्या माध्यमातून एक शब्द एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी ऐकू येऊ

लागला. इ.स. १८९६ साली इटालियन शास्त्रज्ञ मार्कोनी याने बिनतारी संदेश यंत्रेणेचा शोध लावला. ज्यामुळे संपूर्ण जगाला एकमेकांशी संवाद साधण्याच्या नव्या क्रांतीकारी पर्वाचा प्रारंभ झाला. आकाशवाणीच्या स्टुडीओत उच्चारलेला शब्द जसाच्या तसा श्रोत्यांपर्यंत पोहोचू शकतो, हे लक्षात आल्यानंतर मार्कोनी यांनी १९१८ मध्ये इंग्लंडकडून ऑस्ट्रेलियाला पहिला रेडीओ संदेश पाठवला. यानंतर हळूहळू सर्व जगात आकाशवाणीचा विस्तार झाला. एकटया अमेरिकेत दहा हजारापेक्षा जास्त आकाशवाणी केंद्र आहेत.

इ.स. १९२३ मध्ये भारतात पहिला रेडीओ क्लब मद्रास (चेन्नई) येथे स्थापन झाला मात्र भारतात संघटीत स्वरूपाच्या आकाशवाणी प्रसारणाचा प्रारंभ २३ जुलै १९२७ रोजी झाला. त्याचदिवशी पहिले आकाशवाणी केंद्र, मुंबई येथे स्थापन झाले. इंडियन ब्रॉडकास्टींग कंपनी (IBC)या खाजगी कंपनीने ते सुरू केले. तत्कालीन भारताचे व्हाईसरॉय लार्ड आयर्विन यांनी त्याचे उद्‌घाटन केले इ.स. १९३५ मध्ये इंग्लंडच्या मार्कोनी कंपनीला दिल्ली केंद्राच्या प्रक्षेपनाची ऑर्डर देण्यात आली. ऑगस्ट १९३५ मध्ये भारताचे पहिले प्रसारण नियामक म्हणून लायोनके फिल्डन यांची नियुक्ती करण्यात आली. प्रा. बुखारी हे आकाशवाणीचे पहिले डायरेक्टर जनरल झाले.

इंडियन ब्रॉडकास्टींग कंपनी (IBC)हे नाव थोडेसे अवघड वाटत असल्याने फिल्डन यांच्या प्रयत्नाने तत्कालीन व्हाईसरॉय लार्ड लिनलिथगो यांनी इ.स. १९३७ मध्ये ऑल इंडिया रेडीओ (AIR)हे पर्यायी नाव सूचविले. पुढे ऑल इंडीया रेडीओ यासाठी विविध भाषिक प्रसारणासाठी आकाशवाणी हे नाव इ.स. १९५७ मध्ये देण्यात आले. भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयांतर्गत प्रसारभारती या स्वायत महामंडळातर्फे आकाशवाणी व दूरचित्रवाणीचे काम चालते.

स्वातंत्र्यानंतर आकाशवाणीच्या यंत्रणेत प्रचंड विस्तार झाला आहे. सध्या भारतात २०० हून अधिक रेडीओ केंद्रे आहेत.

भारतात आकाशवाणीवरून २१ मुख्य भाषा व २४६ बोलीभाषांतून कार्यक्रम प्रसारीत केले जातात. आकाशवाणीची विदेश सेवा ही ५४ देशांमध्ये उपलब्ध आहे. यामध्ये उर्दू आणि इंग्रजी या भाषांव्यतिरिक्त भारतीय उपखंडातून बोलल्या जाणाऱ्या ७ भारतीय भाषा आणि १६ विदेशी भाषांतून हे कार्यक्रम प्रसारीत केले जातात. प्रामुख्याने फ्रिक्वेन्सी मोडयुलेशन(F.M.) केंद्रे मोठया शहरात आणण्याची योजना चालू आहे. देशात २४५ एफ.एम. केंद्रे आहेत तर ८३९ नवीन एफ.एम. केद्रे येत आहेत.

स्वातंत्र्यानंतर प्रसारभारती अंतर्गत आज कार्यरत असणाऱ्या आकाशवाणीसाठी बहुजन हिताय बहुजन सुखाय हे ब्रीदवाक्य निश्चित करण्यात आले. इ.स. १९६७ मध्ये आकाशवाणीची देशात विविध भारती ही विज्ञापन सेवा सुरू झाली. आकाशवाणीची प्रसारभारती सेवा हे तिचे वेगळे वैशिष्टये होय १९८८ मध्ये राष्ट्रीय वाहिनी सुरू झाली भारतात दिल्ली, कलकत्ता, मद्रास चेन्नई व मुंबई ही आकाशवाणीची शक्तिशाली केंद्रे आहेत. आकाशवाणीच्या प्रसारणाबाबत जनमानस जाणून घेण्यासाठी ए.आर.बी. (ऑडीयन्स रिसर्च ब्युरो) हा स्वतंत्र विभाग आहे.

महाराष्ट्रात अनेक जिल्हयांमध्ये त्या–त्या जिल्हयाच्या ठिकाणी आकाशवाणी केंद्रे स्थापन केलेले केंद्र म्हणजे आकाशवाणी केंद्र होय. या केंद्राची स्थापना ८ मे १९८८ रोजी करण्यात आली आहे. बहुजन हिताय, बहुजन सुखाय हे ब्रीदवाक्य घेऊन आकाशवाणी नांदेड केंद्र उदयास आले. या आकाशवाणी केद्रावर लहान मुलांपासून ते वृध्दांपर्यंत सर्वांना लक्षात घेऊन तयार केलेल्या विविध कार्यक्रमांची रेलखेल दिसून येते. FM band 101.1 Mh2वर या केंद्राचे प्रसारण असल्यामुळे नांदेड जिल्हा व्यापून इतर परभणी, लातूर, हिंगोली अशा जिल्हयांमध्ये प्रसारण

ऐकायला जाते. दैनंदिन जीवनात एक प्रभावी माहितीचे माध्यम म्हणून आकाशवाणी नांदेड केंद्र गेली अनेव दशकं आपली भूमिका तत्परतेने पार पाडत आहे. आकाशवाणी केंद्राचे प्रसारण हे विनातमूल्य असते तसेच निरक्षर लोकही पटकन या माध्यमाशी एकवटली जोडली जातात. त्यामुळे साक्षर आणि निरक्षर असा मोठा श्रोतावर्ग आकाशवाणी नांदेड केंद्राला लाभला आहे. आपले दैनंदीन कामात कसल्याच प्रकारचा अडथळा न आणता आपण नियमितपणे आकाशवाणी नांदेड केंद्राचे प्रसारण ऐकू शकतो. त्यामुळे आपल्या वेळेचा सदुपयोग होतो आणि यामुळेच ग्रामीण भागातील शेतकरी, मजुरवर्ग, महिलावर्ग मोठया प्रमाणात आकाशवाणी नांदेड केंद्राशी जोडल्या गेला आहे.

म्हणूनच या माध्यमाचा (आकाशवाणी नांदेड केंद्राचा)समाजावर झालेला परिणाम तपासण्यासाठी तसेच त्यामधील समारात्मक बाबी, रोचकता, राहिलेल्या उणीवा इत्यादीसाठी हा विषय निवडण्यात आला आहे.

आकाशवाणी नांदेड केंद्राचा आणि विशेषत: त्यावर प्रसारीत होणाऱ्या विविध कार्यक्रमांचा समाजावर अर्थात मुलांवर, युवकांवर आणि महिलावर्गावर, शेतकऱ्यावर, व्यापाऱ्यांवर, अधिकाऱ्यांवर कोणत्या प्रकारचा परिणाम होतो व त्याचे सामाजिक आणि आर्थिक स्थैर्य टिकविण्यासाठी तसेच नैतिकता आणि संस्कृती संवर्धनासाठी आकाशवाणी नांदेड केंद्राची भूमिका कोणती इत्यादी गोष्टीचे अध्ययन करणे हे या संशोधनाचे उद्‌दिष्ट आहे.

सामाजिक परिवर्तन:

सामाजिक परिवर्तन ही एक व्यापक अर्थ व संदर्भ असणारी संकल्पना आहे. समाजशास्त्रात ही संज्ञा निश्चित अर्थाने व तटस्थपणे उपयोगात आणली जाते. बदल चांगला असो अथवा वाईट असो त्या बदलाचा अभ्यास तटस्थपणे करण्यासाठी सामाजिक परिवर्तन ही संज्ञा उपयोगात आणली जाते. समाज संरचनेतील परिवर्तन

म्हणून सामाजिक परिवर्तन या अर्थाने समाजशास्त्र अध्ययन करते. सामाजिक परिवर्तन ही वैश्विक स्वरूपाची सामाजिक प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया अथक सातत्यपूर्ण आहे. सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास सुरूवातीच्या काळात ऐतिहासिक व मानवशास्त्रीय दृष्टीकोनातून केला जाई. आधुनिक काळात ऐतिहासिक व मानवशास्त्रीय दृष्टीकोणातून केला जाई आधुनिक काळात मात्र शास्त्रशुध्दपणे अभ्यास करून त्याचा समाजरचना व कार्यावर कसा परिणाम घडून येतो याचा उलगडा करण्यावर भर दिला जातो. सामाजिक परिवर्तनासंबधी अनेक समाज शास्त्रज्ञांनी अर्थपूर्ण व्याख्या केल्या आहेत.

१. मॉरिस गिन्सबर्ग (Morris Ginsberg):

अभिवृत्ती आणि श्रध्दा यांच्यात होणाऱ्या बदलांचाही सामाजिक परिवर्तनाच्या संज्ञेत समावेश केला जाणे गरजेचे आहे. कारण या घटकामुळे सामाजिक संस्था टिकून राहतात आणि त्यांच्याबरोबरच त्या बदलतात (Term Social change must also include changes in attitudes and beliefs in so far as they sustain institutions and change with them.)

२. हॅरी जॉन्सन(Harry Johnsan):

मुलभूत अर्थाने, सामाजिक परिवर्तन म्हणजे सामाजिक संरचनेतील बदल होय.

३. किंग्जले डेव्हीस (Kingsley Devis):

केवळ समाजाच्या संघटनात म्हणजेच समाजाच्या संरचनेत आणि कार्यात घडून येणाऱ्या बदलांनाच सामाजिक परिवर्तन असे म्हणतात (Social change means only such alternations as occur in social organization i.e. the structure and functions of society).

वरीलव्याख्या लक्षात घेता समाजाच्या मुलभूत संरचनेतील परिवर्तनास सामाजिक परिवर्तन असे म्हणता येईल.

थोडक्यात समाजात होणाऱ्या बदलाला आपण सामाजिक परिवर्तन असे म्हणतो. एखाद्या माध्यमाने आपल्यात अमुलाग्र झालेला बदल म्हणजे परिवर्तन होय आणि हे परिवर्तन समाज व्यापून होत असेल तर त्यास सामाजिक परिवर्तन म्हटले जाते.

उपरोक्त संशोधनासाठी घेतलेला विषय समाजशास्त्राच्या समाजशास्त्रीय बदल आणि विकास (Sociological Change Development) या संकल्पनेत बसविता येतो. आकाशवाणी नांदेड केंद्राच्या कार्यक्रमांची समाजातील परिणामकारकता, झालेले परिवर्तन तपासण्यासाठी आपण समाजशास्त्राच्या समाजशास्त्रीय बदल आणि विकास या संकल्पनेचा आधार घ्यावा लागतो. कार्यक्रमांतून (आकाशवाणी नांदेड केद्राच्या) ग्रामीण शेतकऱ्यांत झालेले परिवर्तन, महिलांमध्ये झालेले परिवर्तन, युवकांमध्ये झालेले परिवर्तन, मुलांमध्ये झालेले परिवर्तन इ. संशोधनातून तपासावयाचे आहे. या संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

संदर्भ साहित्याचा आढावा:

विषयाला अनुसरून संदर्भ साहित्याचा आढावा घेत असताना सर्वप्रथम विषयाची व्याप्ती ठरविणे कर्मप्राप्त ठरते. प्रस्तुत विषय हा आकाशवाणी नांदेड केंद्राच्या कार्यक्रमांचा समाजावर होणाऱ्या परिणामांचा आणि परिवर्तनाचा समाजशास्त्रीय अभ्यास या शिर्षकाचा आहे. यामध्ये समाजातील विविध स्तरावरील लोकांवर आकाशवाणी नांदेड केंद्राच्या कार्यक्रमांचा परिणाम तपासणे तथा त्यांच्यात झालेले परिवर्तन कोणत्या प्रकारचे आहे. याचा अभ्यास या संशोधनातून करावयाचा आहे.

उपरोक्त विषयाला समाजशास्त्राचे अधिष्ठान प्राप्त करून देण्यासाठी संबधित विषय हा Sociological Change and Development (समाजशास्त्रीय बदल आणि विकास) या संकल्पनेत बसवला आहे. तसेच वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब

करण्यात आला आहे. डॉ. प्रदिप आगलावे यांच्या सामाजिक संशोधन पध्दती व तंत्रे यांचा अभ्यास करण्यात आला आहे. डॉ. रा.ना. घोटाळे यांच्या सामाजिक संशोधन पध्दती (Sociological Method)याचा अभ्यास करण्यात आला आकाशवाणीचा ऐतिहासिक वृतांत विविध क्रमिक पाठयपुस्तकातून अभ्यासला गेला आहे. डॉ. दिलीप शिंदे यांच्या आकाशवाणी मुंबई कंद्राच्या अस्मिता वाहिनीवरून प्रसारीत झालेल्या दिलखुलास कार्यक्रमाचा एक अभ्यास (२००६—२००९) हा शोधप्रबंध अभ्यासण्यात आला. तसेच मिलिंद व्यवहारे यांचा आकाशवाणी नांदेड केंद्रावरील प्रसारीत होणाऱ्या किसानवाणी या कार्यक्रमाचा विशेष अभ्यास हा शोधप्रबंध अभ्यासण्यात आला.

आकाशवाणी नांदेड केंद्राच्या वर्धापन दिनानिमित्ताने दै. लोकपत्र आणि दै. गोदातीर या वर्तमानपत्रात प्रकाशित झालेल्या संचिता केळकर यांच्या विविध लेखाचा अभ्यास करण्यात आला.

डॉ. अर्पिता शर्मा यांचा Community Radio as an Effective Tools for Agricultural Development (Research) हा प्रबंध वाचण्यात आला. पायल कामत यांचा प्रसारभारतीवरील प्रबंध वाचण्यात आला. तसेच साद उल्हा खान यांच्या Role of Community Radio in Rural Development या शोधप्रबंधाचा संदर्भ घेण्यात आला. मिलवी बिरावा या युगांडाच्या कार्यक्रम अधिकारी यांच्या साहित्याचा आढावा घेण्यात आला.

विषयाची निवड:

आजचे युग हे प्रसारमाध्यमाचे युग म्हणून ओळखले जाते. प्रसार माध्यमांव्दारे मनोरंजन करणे, माहिती देणे, मत परिवर्तन करणे, लोकशिक्षण व सामाजिक अभिसरण असे कितीतरी उद्देश साध्य होतात. आज प्रसारमाध्यमांमध्ये वृत्तपत्र, आकाशवाणी, टी.व्ही (दूरदर्शन) इ. अनेक प्रकाराचा समावेश होतो.

यामध्येही वृत्तपत्र हे फक्त साक्षर लोकांसाठी महत्वाचे आहे. परंतु रेडीओ (आकाशवाणी) या माध्यमाने ज्ञान आणि मनोरंजन घराघरात पोहचविले आहे. म्हणून मार्शल मॅकलहॉन या माध्यम तज्ज्ञाने जग हे एक वैश्विक खेडे (Global Village)झाल्याचे मत मांडले आहे.

मनोरंजन आणि जनसंपर्काच्या प्रमुख माध्यमापैकी आकाशवाणी हे माध्यम आहे अनेक जिल्हयांच्या ठिकाणी आकाशवाणी केंद्र उदयाला कार्यरत आहेत. त्यापैकी नांदेड या ठिकाणी असलेले आकाशवाणी नांदेड हे केंद्र होय. आकाशवाणी नांदेड केंद्र हे आजच्या स्थितीत एक प्रभावी प्रसारमाध्यम म्हणून उदयाला आले आहे. त्याच्या विविध पैलुंचा अभ्यास करणे या आकाशवाणी नांदेड केंद्राचा जनमानसावर कोणत्या प्रकारचा परिणाम झाला आहे हे तपासणे या संशोधनाचे उद्दिष्ट आहे.

बहुजन हिताय, बहुजन सुखाय हे ब्रीदवाक्य घेऊन नांदड आकाशवाणी केंद्र कार्यक्रमांचे नियोजन अणि प्रसारण करत असते. लहानांपासून ते अगदी वृध्दापर्यंत मोठा श्रोतावर्ग असल्यामुळे या प्रत्येक वयोगटाला विचारात घेऊन कार्यक्रमांची रचना केली जाते. विविध प्रख्यात व्यक्तींच्या मुलाखतीतून अनेक समाजातील वर्गाला प्रोत्साहन मिळत असते यातूनच आकाशवाणी नांदेड केंद्र प्रेरणा देणारे केंद्र असेही काहींना वाटू लागले आहे.

विविध कार्यक्रमांची रेलचेल आपल्याला आकाशवाणी नांदेड केंद्रावर दिसून येते. जसे की, लहान मुलांसाठी गंमत–जमत, युवकांसाठी युवावाणी, शेतकऱ्यांसाठी किसानवाणी, महिला भगिनींसाठी घरसंसार या प्रकारचे कार्यक्रम तसेच बातमीपत्र, सध्या क्रीडा, वार्तापत्रे, वृत्तसमिक्षा, विधिमंडळ व संसद समालोचन, लघुनाटय, आरोग्यविषयक कार्यक्रम, बाजारभाव, संगीत, चर्चा, भाषणे, लोकसंगीत, लोकनाटय, नाटयसंगीत, वाद्यसंगीत, पर्यावरण, राष्ट्रीय उत्सव, जागतिक घडामोडी,

कामगार, विज्ञान व तंत्रज्ञान साहित्य, संस्कृतीविषयी असे अनेक कार्यक्रम आकाशवाणी कंद्रावरून यशस्वीपणे प्रसारीत होतात. याचबरोबर बोला काय म्हणता? या सारख्या कार्यक्रमांतून प्रशासनातल्या अनेक दिग्जांची प्रशासनातील माहिती व शासनाच्या विविध कल्याणकारी योजना यांची माहिती त्यांच्याच तोंडून ऐकायला मिळते. नव्हे तर या कार्यक्रमाचे प्रसारण सजीव असल्यामुळे थेट दूरध्वनीवरून संपर्क साधून प्रशासनाची भूमिका आणि आपल्या प्रश्नांचे उत्तर तमाम श्रोतावर्गाला मिळत असते.

आकाशवाणी केंद्रावर प्रसारीत होणाऱ्या कार्यक्रमांचा समाजमनावर कोणत्या प्रकारचा परिणाम होतो तसेच त्यांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावण्यासाठी आकाशवणी नांदेड केंद्राची भूमिका काय आहे तसेच ज्ञान मनोरंजन आणि माहिती या त्रिसुत्रीनुसार कार्यक्रमाचे नियोजन तपासणे ही संशोधनाची भूमिका आहे. तसेच एक प्रभावी माध्यम म्हणून आकाशवाणी केंद्र आपली भूमिका पार पाडत असताना त्यांच्या विविध पैलूंचा अभ्यास करणे तसेच केंद्राची गुणात्मकता कशी आहे, सद्य परीस्थितीत आकाशवाणी नांदेड केंद्राचा अभ्यास करून शेवटी काही निष्कर्षाच्या आधारे परिणामकारक उपाय सूचविणे हे विषयाच्या अनुषंगाने क्रमप्राप्त ठरते.

संशोधनाची उद्दिष्टे:

प्रस्तुत संशोधनात विषयाच्या अनुषंगाने पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

१. आकाशवाणी नांदेड केंद्राच्या समाजभिमुख कार्यक्रमाचे विवेचन करणे.

२. आकाशवाणी नांदेड केंद्राचा सामाजिक प्रबोधनाचे माध्यम म्हणून अभ्यास करणे

३. आकाशवाणी नांदेड केंद्राच्या कार्यक्रमाचाशेतकऱ्यांवर झालेला परिणाम जाणून घेणे.

४. आकाशवाणी नांदेड केंद्राच्या कार्यक्रमांचास्त्रीयांवर झालेला परिणाम जाणून घेणे.

५. आकाशवाणी नांदेड केंद्राच्या कार्यक्रमांचा लोकमानसात झालेला प्रसार अभ्यासणे.

६. आकाशवाणी नांदेड केंद्राच्या कार्यक्रमांचा जनमाणसात होणारा सांस्कृतिक परिणाम तपासणे.

७. आकाशवाणीच्या कार्यक्रमांमुळे झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास करणे.

संशोधनाचीगृहितके:

१. आकाशवाणी नांदेड केंद्र हे एक प्रभावी माध्यम आहे.

२. आकशवाणीसाठी बहुजन हिताय बहुजन सुखाय हे ब्रीदवाक्य निश्चित करण्यात आले आहे.

३. आकाशवाणी नांदेड केंद्रावरील कार्यक्रम विविध वयोगटातील लोकांना लक्षात घेऊन बनविलेले असतात.

४. आकाशवाणी नांदेड केंद्रावरील कार्यक्रमात ज्ञान, माहिती आणि मनोरंजन हया त्रिसूत्रीचा अवलंब केलेला दिसून येतो.

५. आकाशवाणी नांदेड केंद्र सामाजिक प्रबोधनाच्या बाबतीत प्रभावी माध्यम म्हणून उदयास आले आहे.

६. आकाशवाणी नांदेड केंद्राच्या कार्यक्रमात सामाजिक, आर्थिक, धार्मिक, नैतिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक गोष्टीचा समावेश आहे.

७. आकाशवाणी कार्यक्रमामुळेशेतकरी, तरूण, महिला, वृध्द, लहान मुले, व्यावसायिक इत्यादीमध्ये परिवर्तन झालेले आहे.

संशोधनाचा आराखडा:

संशोधनाच्या उद्देशाची प्राप्ती आणि संशोधनाला सुयोग्य दिशा देण्यासठी या संबधीत संशोधन आराखडा तयार केला जातो. संशोधन समस्येचा विचारपूर्वक अंदाज घेउन त्या समस्येच्या आराखडयांचे स्वरूप निश्चित करावे लागते. प्रत्येक संशोधन आराखडयाचे विशेष महत्व आहे. प्रस्तुत संशोधनाचा उद्देश आकाशवाणी नांदेड कंद्राच्या प्रसारणाचा अनमानसावरील परिणामाचा समाजशास्त्रीय अभ्यास वर्णन करणे असल्याने वर्णनात्मक संशोधन आराखडा अवलंब करण्यात आला आहे. त्या आधारे संशोधनाची दिशा ठरवून तथ्य संकनासाठी बहुतांशी व अंशत: संख्यात्मकदृष्टया अध्ययन केले त्या आधारे मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण करून निष्कर्ष काढले आहेत.

अभ्यास विषयाचे क्षेत्र:

आकाशवाणी नांदेड केंद्र हे वसरणी नांदेड येथे आहे. FM band 100.1 Mh2वर या आकाशवाणी नांदेड केंद्राचे प्रसारण असल्यामुळे नांदेड जिल्हा व्यापून इतर जिल्हयासाठी हे प्रसारण ऐकायला जाते. नांदेड जिल्हयातील एकुण सोळा तालुके आणि त्याचबरोबर परभणी, हिंगोली, लातूर (अहमदपूर) या ठिकाणी प्रसारण ऐकायला जाते. आकाशवाणी नांदेड केंद्राच्या कार्यक्रमांचा सामाजिक परिणाम अध्ययनासाठी संशोधकाने नांदेड जिल्हयाची निवड केली आहे. त्यापैकी संशोधनाच्या अध्ययनासाठी नांदेड (शहर), कंधार, लोहा, मुखेड, हदगांव, हिमायतनगर, भोकर, उमरी, बिलोली, अर्धापूर, मुदखेड, देगलूर, नायगांव या तालुक्याची निवड केली आहे.

नमुना निवड (Sampling):

संशोधनात नमुना (Sampling) जर प्रातिनिधीक आणि योग्य असेल तर निष्कर्ष देखील सुयोग्य राहतात. म्हणून संशोधनाची यशस्वीता व सार्थकतेकरीता प्रातिनिधिक नमुन्याची आवश्यकता असते. म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी विषयासाठी प्रातिनिधीक स्वरूपाचेतथ्य संकलन होण्यासाठी संशोधन क्षेत्रातील एकूण ३०० उत्तरदात्यांची गैरसंभाव्यता नमुना निवड (Non-Probability Sampling) निवड प्रकारातील सहेतुक नमुना निवड (Purposive Sampling) पध्दती निवड करून त्यांच्या मुलाखती घेण्यात येतील. समग्रातील सर्वांना प्रतिनिधीत्व मिळेल याची दक्षता घेण्यात येईल. नांदेड जिल्हयामधील काही तालुक्यातील १३ तालुक्यातील ३०० उत्तरदाच्यांची निवड करून त्यांच्यावर आकाशवाणी नांदेड केंद्राच्या प्रसारणाचा परिणाम, सांस्कृतिक, धार्मिक व शैक्षणिक इ. विषयी माहिती मिळविली आणि तथ्य संकलित केले आहे.

सांख्यिकीय साधने :

यामध्ये तथ्यांचे विश्लेषण करण्यासाठी अनेक सांख्यिकीय साधनांचा वापर करण्यात येणार आहे. प्रामुख्याने गणितीय मध्य, मध्यका, बहुलक व विचलन मध्य या सांख्यिकीय साधनांचा वापर करण्यात येणार आहे. तसेच गृहितके तपासण्यासाठी टेस्ट चा वापर करण्यात येणार आहे आणि कोष्टके दर्शविण्यासाठी आलेख, नकाशे, चित्र यांचा सुध्दा सांख्यिकीय साधनांमार्फत वापर करण्यात येणार आहे.

तथ्यसंकलन :

सामाजिक संशोधनात तथ्ये, स्त्रोत महत्वाची असतात. तथ्य व साधनांच्या आधारावरच निष्कर्ष मांडले जातात. म्हणून ऐतिहासिक साधनांचे शास्त्रीय संकलन करणे आवश्यक असते. त्यामुळे प्रस्तुत संशोधन विषयाच्या संशोधनासाठी दोन

प्रकारच्या स्त्रोत साधनांचा उपयोग करण्यात आला. त्यात प्राथमिक स्त्रोत (Primary Sources) व दुय्यम स्त्रोत (Secondary Sources) यांचा समावेश होतो.

प्राथमिक स्त्रोत (Primary Sources):

यामध्ये प्राथमिक स्त्रोत म्हणून मुलाखत–अनुसूची (Intervivew Schedule) तंत्राचा वापर केला आहे. तसेच नांदेड शहरातील, ग्रामीण भागातील व तालुक्यातील श्रोत्यांना प्रत्यक्ष भेटून सर्वेक्षण (Survey) केला. शाळेत, महाविद्यालयात उपस्थित राहून सहभागी निरिक्षण (Observation) करून माहिती गोळा केली आहे.

दुय्यम स्त्रोत (Secondary Sources):

यामध्ये दुय्यम स्त्रोत म्हणून विविध ग्रंथालयामध्ये उपलब्ध असलेले संदर्भग्रंथ, अप्रकाशित शोधप्रबंध, ज्ञानकोश, वर्तमानपत्रे शासकीय अहवाल, गॅझेट, साप्ताहिके, मासिके, संकेतस्थळे (Website) यातून माहिती प्राप्त केली आहे.

प्रकरणांची रूपरेक्षा

प्रकरण १ ले	आकाशवाणी विषयक साहित्याचा आढावा
प्रकरण २ रे	संशोधन पध्दती
प्रकरण ३ रे	उत्तरदात्याची वैयक्तिक माहिती
प्रकरण ४ थे	कार्यक्रमांचा ग्रामीण शेतकऱ्यांवर झालेला परीणाम आणि परिवर्तन
प्रकरण ५ वे	कार्यक्रमांचा स्त्रीयांवरील परिणाम व परिवर्तन
प्रकरण ६ वे	कार्यक्रमांचा युवकांवरील परिणाम व परिवर्तन
प्रकरण ७ वे	निष्कर्ष, सूचना व उपाययोजना
	संदर्भ ग्रंथ सूची

संदर्भग्रंथ:

१.	Harry Johnson	-	Sociology-A Systematic Introduction
२.	August Komte	-	Stages of Development or Law of Three Stages
३.	Karl Mark	-	Dialectical Materialism
४.	सामाजिक संशोधन पध्दती तंत्रे	-	डॉ. प्रदीप आगलावे
५.	कुरूक्षेत्र—ग्रामीण विकास को समर्पित	-	मासिक, एप्रिल २०१६
६.	भारत मे ग्रामीण विकास	-	डॉ. डी.सी.पत्न (विश्वभारती पब्लिकेशन्स, नवी दिल्ली)
७.	आकाशवाणीचा ऐतिहासिक वृतांत	-	१२ वी क्रमिक पाठयपुस्तके (समाजशास्त्र आणि इतिहास)
८.	आकाशवाणी मुंबई केंद्राच्या अस्मिता वाहिनीवरून प्रसारीत झालेल्या दिलखुलास कार्यक्रमाचा एक अभ्यास (२००९—०९)	-	१२ वी क्रमिक पाठयपुस्तके (समाजशास्त्र आणि इतिहास)
९.	Community Radio as an Effective tool for Agricultural Development (Research)	-	Stages of Development or Law of Three Stages
१०.	Essay on Prasar Bharati (Broadcasting Corporation of India)	-	Payal Kamat
११.	Role of Community Radio in Rural Development	-	Saad Ullah Khan, Research Scholar, Department of Mass Communication, Aligarh Muslim University, Aligarh 202002, U.P. India

१२.	The Role of Rural Radio in Agricultural and Rural Development Translating Agricultural Research Information into Messages for Farm Audiences	-	Saad Ullah Khan, Research Scholar, Department of Mass Communication,
१३.	आकाशवाणी नांदेड केंद्रावरील प्रसारीत किसानवाणी कार्यक्रमाचा विशेष अभ्यास	-	मिलिंद व्यवहारे
१४.	आकाशवाणी नांदेड केंद्रावरील श्रोत्यांचा आवाज	-	२८ मे २०१४ दै. लोकपत्र, संचिता केळकर (नै.उ.आ.कें.नांदेड)
१५.	कार्यक्रमांच्या विविधतेने शहरास ग्रामीण भागातील मनावर अधिराज्य गाजविणारे आकाशवाणी नांदेड केंद्र		दि. २९ मे २०१६ दै. गोदातीर संचिता केळकर (नै.उ.आ.कें.नांदेड)
१६.	नांदेड आकाशवाणी केंद्राची यशस्वी वाटचाल		दि. २९ मे २०१६ दै. गोदातीर संचिता केळकर (नै.उ.आ.कें.नांदेड)

संशोधक

कु. घोटकेकर कांचन नारायणराव

मार्गदर्शक

प्राचार्य, डॉ. डी. डी. घोडगे
लोकमान्य महाविद्यालय, सोनखेड
जि. नांदेड

Filename: chitte (2 Oct- 2016)
Directory: F:\CHITTE P.G\CHITTE\JCS\JCS Winter Exam. 2016
Template: C:\Users\admin\AppData\Roaming\Microsoft\Templates\Normal.dotm
Title:
Subject:
Author: ELIGIBILITY LAB
Keywords:
Comments:
Creation Date: 04-Oct-16 4:57:00 PM
Change Number: 2
Last Saved On: 04-Oct-16 4:57:00 PM
Last Saved By: admin
Total Editing Time: 1 Minute
Last Printed On: 04-Oct-16 6:13:00 PM
As of Last Complete Printing
Number of Pages: 17
Number of Words: 3,050 (approx.)
Number of Characters: 17,389 (approx.)